**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्घाटन

- राज्यातल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढ, थकबाकीचा पहिला हप्ता पुढच्या महिन्यात मिळणार

- अवैध सावकारीवर निर्बंध आणण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचं सरकारचं आश्वासन

- अंमली पदार्थांच्या समस्येवर कठोर कारवाई करण्याची सर्वपक्षीय सदस्यांची विधानसभेत मागणी

**आणि**

- मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर

**<><><><><>**

आयुष उपचार पद्धतींना प्रोत्साहन दिल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तसंच पर्यावरण रक्षणालाही हातभार लागतो, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**- - - होल्ड - राष्ट्रपती बाइट - - -**

यावेळी त्यांनी आयुष उपचार पद्धतींचे फायदे आणि त्यांच्या प्रचार प्रसारासाठी सरकारकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.
राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी छोट्या छोट्या दुखण्यांसाठी घरगुती उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा तसंच व्यायामाचा सल्ला दिला.

आयुष पर्यटनावर भर देण्याची गरज केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केली.

या चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. मेळाव्यापूर्वी राष्ट्रपती मुर्मू यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेतलं. संध्याकाळी राष्ट्रपती नागपूर इथं ब्रह्मकुमारी संस्थेच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

**<><><><><>**

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढ करून ५५ वरून ५८ टक्क्यावर नेण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची घोषणा राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी विधानपरिषदेत केली. याचा फायदा ५ लाख१६ हजार कार्यरत कर्मचाऱ्यांना, तर ८ लाख ७२ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल, अशी माहिती त्यांनी दिली. चालू महिन्यापासून याची अंमलबजावणी सुरू होईल. जुलै ते ऑक्टोबर २०२५ ची थकबाकी गुढीपाडव्यानिमित्त मार्च २०२६ मध्ये दिली जाईल, तर नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ च्या थकबाकीबाबत वेगळा आदेश निर्गमित केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

शिवशाही वाहनं वारंवार बिघडत असल्याने, तसंच प्रवाशांचा प्रतिसाद कमी असल्याने शिवशाही वाहनांचं रूपांतर निमआराम आणि साध्या वाहनांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती सरकारनं आज विधानपरिषदेत लेखी उत्तरद्वारे दिली.

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मूळ आरेखनामधे खोडदच्या दुर्बिणीच्या अँटेनाला व्यत्यय येत असल्यामुळे केंद्र सरकारनं या मूळ मार्गाला आक्षेप घेतला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत

दिली. या प्रकल्पाचा मूळ मार्ग बदलून तो शिर्डीमार्गे नेण्यासंदर्भात आमदार सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. सरकारची भूमिका पूर्वीच्या आरेखनाला अनुकूल असून त्यात कमीत कमी बदल करावा या दृष्टीने तज्ज्ञांकडून पर्यायी आखणी करून घेऊ आणि त्यानुसार काम करू, असं आश्वासन त्यांनी दिलं.

रायगड जिल्ह्यात खोपोली इथं मंगेश काळोखे हत्या प्रकरणात मकोका कायदा लावता येईल का, हे तपासून बघत आहोत, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज दिली. आमदार भाई जगताप यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयावर भ्रष्टाचारविरोधी पथकाने छापा टाकल्याचा मुद्दा सभागृहात चर्चेला घेण्याची सूचना फेटाळल्याची माहिती सभापतींनी दिली. याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. गदारोळातच सभापतींनी लक्षवेधी सूचना पुकारल्या. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

अवैध सावकारीवर निर्बंध आणण्यासाठी विद्यमान कायद्यात दुरुस्ती करण्याचं आश्वासन सरकारनं आज विधानसभेत दिलं. चंद्रपूर जिल्ह्यातल्या एका शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी मूत्रपिंड विकावं लागल्याप्रकरणी उपस्थित प्रश्नावर गृहराज्यमंत्री पंकज भोयर बोलत होते. याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करू. पीडित शेतकऱ्याला सरकार शक्य ती मदत देईल असं भोयर यांनी सांगितलं. याप्रकरणातल्या सावकारावर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यासाठी प्रयत्न करू, असंही ते म्हणाले.

मासिक पाळीच्या काळात महिलांना रजा मिळण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांच्या संदर्भात समिती नेमून निर्णय घेतला जाईल असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत

सांगितलं. स्त्री भ्रूणहत्ये प्रकरणी सहाशे पेक्षा जास्त गुन्हे झाले आहेत, त्यासंदर्भात धडक मोहीम राबवून कठोर कारवाई केली जाईल, असं आबिटकर यांनी सांगितलं. स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायद्यातल्या त्रुटी दूर करण्यासाठी निर्णय घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केले जाणार नाही, असं मंत्री भरत गोगावले यांनी आज विधानसभेत स्पष्ट केलं. मागणीनुसार काम देण्याचं धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही, असं ते म्हणाले. तसंच केंद्र सरकारकडून निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू असून ही योजना अधिक सक्षमपणे राबवली जाईल. सर्व मजुरांचे पैसे देखील दिले जातील, असं आश्वासन मंत्र्यांनी सभागृहात दिलं.

**<><><><><>**

विधानसभेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारच्या कारभारावर जोरदार टीका केली. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, शाळा बंद पडत आहेत, पण यातला एकही मुद्दा राज्यपालांच्या अभिभाषणात आला नाही, आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, सरकार केवळ घोषणाबाजी करत आहे, असं वडेट्टीवार म्हणाले.

राज्यात बेरोजगारीत वाढ होत असून देशाच्या अर्थव्यवस्थेत राज्याचा वाटा कमी होत असल्याचं राज्यपालांनी कबूल केल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले. राज्यात अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून तरुण पिढी व्यसनात अडकली आहे, याला सरकारनं पायबंद घालावा, अशी मागणी त्यांनी केली. शिवसेना आमदार निलेश राणे आणि काँग्रेस नेते अमिन पटेल यांनीही अमली पदार्थांचा प्रश्न गंभीर बनल्याचं सांगितलं. ड्रग्स माफियांविरोधात कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली.

राज्य सरकार पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ठोस काम करत आहे, असं भाजपाचे अतुल भोसले म्हणाले. अनेक विकासकामं सरकारनं केली असून परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याला यश आल्याचं त्यांनी सांगितलं. शेखर निकम, विनय कोरे यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे आज सादर केला. चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प साडे ७४ हजार कोटी रुपयांचा होता. मुंबई महापालिकेची राज्य सरकारकडे १० हजार कोटी रुपयांहून अधिक देणी शिल्लक असल्याचं अर्थसंकल्पात नमूद आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इस्त्रायलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज दुपारी तेल अवीवला पोचले. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू आणि त्यांच्या पत्नी सारा नेतन्याहू यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं.

**//<><><><><>//**